**प्रेसनोट दिनांक २३/०५/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**एका महिलेची सुमारे २ महिन्यांपुर्वी हरवलेली पर्स येरवडा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सदर महिलेचा शोध घेवून परत दिली.**

---

महिला प्रियांका श्रीपाद कुलकर्णी,रा.रेणूकामाता क्लिनीक,तहसिल रोड, रायसोल,जि.वाशिम यांच्या आई कडून एकूण रोख ९,०००/- रूपये, आधारकार्ड, पॅनकार्ड, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड असे असलेली त्यांची पर्स सुमारे २ महिन्यांपुर्वी प्रवासा दरम्यान हरविली होती. सदरची पर्स एका पोलीस मित्रास सापडल्याने ती त्याने येरवडा पोलीस स्टेशन येथे हजर केली.

राजेंद्र कदम,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.उप.नि.मंगेश भांगे, पो.हवा.९०० हनुमंत जाधव यांनी सदर पर्स मधील कागद पत्रांवरून सदर महिलेचा मोबाईल नंबर प्राप्त करून,त्यावर संपर्क साधून त्यांना त्यांची पर्स मिळून आल्याचे सांगितले. तसेच त्यांना येरवडा पोलीस स्टेशन येथे बोलावून घेऊन त्यांचे आईची पर्स त्यांचे ताब्यात दिली. आईची पर्स, रोख रक्कम व महत्वाची मुळ कागदपत्र हे पोलीसांकडून परत मिळाल्याने प्रियांका श्रीपाद कुलकर्णी यांनी पोलीसांचे आभार व्यक्त केले आहेत.

अशा प्रकारे येरवडा पोलीस स्टेशन कडील राजेंद्र कदम,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पो.उप.नि.मंगेश भांगे, पो.हवा.९०० हनुमंत जाधव यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

(राजेंद्र कदम)<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,<br>
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे